आसन क्र. १______________________

(असल्यास) आसन क्र. २ ______________________

**पुणे विद्यापीठ**
**संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग**

## प्रवेश परीक्षा २००७- सामाइक लेखी परीक्षा

रविवार, १ जुलै २००७ | वेळः तीन तास | एकूण गुणः १००

Note: ही प्रश्नपत्रिका मराठीत आहे. प्रश्नांची उत्तरे मराठीतूनच लिहावी लागतील. आपण इंग्रजीतून उत्तरे लिहिणार असाल तर इंग्रजी प्रश्नपत्रिका मागून घ्या. This is Marathi language version of the question paper. You will have to answer it in Marathi ONLY. If you wish to answer in English, ask for English version.
* या प्रश्नपत्रिकेचे दोन भाग आहेत. भाग १ ची प्रश्नपत्रिका प्रथम देण्यात येईल.
* भाग १ मधील प्रश्नांची उत्तरे प्रश्नपत्रिकेत दिलेल्या कोऱ्या जागेत लिहायची आहेत.
* भाग १ पूर्ण केल्यावरच भाग २ ची प्रश्नपत्रिका देण्यात येईल.
* भाग १ची प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी एका तासाहून जास्त वेळ लावू नये असा आपल्याला सल्ला आहे.

**(भाग १ः गुण ५०)**

प्र.१ पुढीलपैकी **कोणत्याही १५** प्रश्नांची उत्तरे लिहा. (१५)

१. फ्रान्सचे नवनिर्वाचित अध्यक्ष- ----------------------------------------------------

२. जी ८ राष्ट्रांची परिषद नुकतीच या देशात झाली- - ------------------------------------------

३. काझीरंगा अभयारण्य या राज्यात आहे- - ----------------------------------------------

४. ही खगोलीय वस्तू आता ग्रह मानली जात नाही- ------------------------------------------

५. रंग दे बसंती या चित्रपटाचे दिग्दर्शक- - ----------------------------------------------

६. ओरिसात असलेले भारतातील एक मोठे सरोवर- ------------------------------------------

७. किरण देसाई यांना या पुस्तकासाठी बुकर पारितोषिक मिळाले- ---------------------------------

p. 2→

For office use only

| Q. 1 (15) | Q. 2 (10) | Q. 3 (10) | Q. 4 (5) | Q. 5 (5) | Q. 6 (5) | Total (50) | Examiner's Signature |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

८. उत्तर कोरियाची राजधानी -------------------------------------------------------

९. २००७ च्या महाराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी यांची निवड झाली होती--------------------------------------

१०. भारताचे उपराष्ट्रपती या गृहाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात------------------------------------------------

११. २००६ सालच्या फूटबॉल विश्वकरंडकाच्या अंतिम सामन्यात खळबळ उडवून देणारा फ्रेंच खे़ळाडू--------------------

१२. भारतात तीनही सशस्त्र दलांच्या सर्वोच्च प्रमुखपदी हे असतात- ------------------------------------------

१३. अजंठा लेणी या जिल्ह्यात आहेत- ---------------------------------------------------

१४. तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांच्या मर्जीतून उतरलेले केंद्रीय मंत्री--------------------------------------------

१५. गेल्या वर्षी ज्ञानपीठ पारितोषिकाने गौरवण्यात आलेले मराठी कवी- ---------------------------------------

१६. कराड येथे कृष्णा नदीला मिळणारी नदी- ------------------------------------------------

१७. २००८च्या ऑलिंपिक स्पर्धेसाठी पात्र ठरलेला कोल्हापूरचा जलतरणपटू-----------------------------------

१८. भगवान श्रीकृष्णाचा भाऊ-------------------------------------------------------

१९. शेअर्सच्या व्यवहारासाठी हे बँक खाते आवश्यक असते------------------------------------------

२०. भारताच्या इतिहासातील, १५० वर्षांपूर्वी घडलेली महत्त्वाची घटना---------------------------------------

**प्र. २ भाषिक कौशल्ये (एकूण गुणः १०)**

१. पुढीलपैकी **<u>कोणत्याही दोन</u>** वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा. (२)

क) तळ्यात मळ्यात करणे ------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

ख) सुक्याबरोबर ओलेही जळणे ---------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

ग)  हवेत इमले बांधणे------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

घ) रात्रीचा दिवस करणे -------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

२.पुढीलपैकी **कोणत्याही दोन** शब्दांसाठी प्रत्येकी दोन समानार्थी शब्द द्या. (२)

क) अनन्वित ------------------------------------------------------------

ख) मानव ------------------------------------------------------------

ग) निखालस ------------------------------------------------------------

घ) यातना ------------------------------------------------------------

३.पुढीलपैकी **कोणत्याही चार** शब्दांसाठी प्रत्येकी एक विरूद्धार्थी शब्द द्या. (२)

क) गर्विष्ठ ------------------------------------------ ख) समानता -----------------------------------------

ग) आकुंचन------------------------------------------ घ) अधोगती-----------------------------------------

च) विपुल ------------------------------------------ छ) अचूक -----------------------------------------

४. पुढील वाक्यांमध्ये शुद्धलेखन, व्याकरण व विरामचिन्हे यांच्या काही चुका आहेत. सर्व वाक्ये अचूक लिहून काढा व मूळ वाक्यांतील ज्या शब्दांमधील चूक दुरूस्त केली असेल अशा शब्दांखाली रेघ ओढा. शब्दांची भर घालू नका किंवा शब्द गाळूही नका तर फक्त चुकीच्या शब्दांच्या/चिन्हांच्या जागी अचूक शब्द/चिन्ह लिहा. (४)

१. लाहान मुलांना आवडेल असेच हे खेळणे असतात.

---------------------------------------------------------------

२. ते म्हणाले, ‘त्या दिवसा  पासून माझे आयुष्यच बदलून गेले.

---------------------------------------------------------------

३. प्रा कुलकर्णी कोणता विषय शिकवतात.

-----------------------------------------------------------------------

४. ज्या अर्थी तो आला नाही म्हणजे तो नक्किच आजारी असणार.

-----------------------------------------------------------------------

प्र.३ पुढीलपैकी **कोणत्याही पाच** व्यक्ती अलीकडच्या काळात बातम्यांत का होत्या ते २० शब्दांत स्पष्ट करा. (१०)

१. गुर्जर समाज

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

२. मायावती

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

३. सिंगूर

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

४. दिनकरन

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

५. राफेल नदाल

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

६. अविनाश भोसले

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

७. बाराबंकी येथील शेतजमीन

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

८. मनिंदर सिंग

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

९. सुनीता विल्यम्स

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

१०.स्नेहल भाटकर

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

प्र. ४ पुढील जोड्या जुळवा. प्रश्नाखाली दिलेल्या जागेतील आकड्यांपुढे योग्य जोडीचे निदर्शक अक्षर लिहा. जोड्या दर्शवणाऱ्या रेघा ओढू नका. तशा रेघा ओढल्यास उत्तराला शून्य गुण देण्यात येतील. (५)

| | |
|---|---|
| i) शिल्पा शेट्टी | a) क्रीडा समालोचक |
| ii) मी मराठी | b) रामोजी फिल्म सिटी |
| iii) मुंबई मिरर | c) सहारा वन |
| iv) इंडियन आयडल | d) प्रसार भारती |
| v) ई टीव्ही | e) श्री अधिकारी ब्रदर्स |
| vi) इंडिया टुडे | f) दि बिग ब्रदर |
| vii) चारू शर्मा | g) सेन्सॉर बोर्ड |
| viii) दूरदर्शन | h) टाइम्स ऑफ इंडिया |
| ix) बिगेस्ट लुजर विन्स | i) सोनी |
| x) शर्मिला टागोर | j) आज तक |

i) ------, ii) ------, iii) ------, iv) ------, v) ------, vi) ------, vii) ------, viii) ----- -, ix) ------, x) ------

प्र. ५ पुढीलपैकी कोणत्याही पाच लघुरूपांचे पूर्ण रूप द्या. आपण इंग्रजी पूर्णरूप रोमन लिपीत **किंवा** देवनागरी लिपीत लिहू शकता. **किंवा** या संस्थांची अधिकृत हिंदी/ मराठी नावे देवनागरीत लिहू शकता. (उदा. UGC- University Grants Commission/ युनिवर्सिटी ग्रँट्स कमिशन / विश्वविद्यालय अनुदान आयोग / विद्यापीठ अनुदान आयोग) (५)

1. SEZ ------------------------------------------------------------

2. PETA ------------------------------------------------------------

3. CET------------------------------------------------------------

4. TDP------------------------------------------------------------

5. UPA------------------------------------------------------------

6. BSP------------------------------------------------------------

7. I I T------------------------------------------------------------

8. I T I ------------------------------------------------------------

प्र. ६ खालीलपैकी **कोणत्याही पाच** संज्ञा एका वाक्यात स्पष्ट करा (५)

१. नागरिकांची पत्रकारिता (सिटीजन जर्नेलिझम)

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

२. जमनत चाचणी (ओपिनियन पोल)

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

३.  ब्रिक (BRIC) देश

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

४. ब्रेकिंग न्यूज

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

५.  रिॲलिटी शो

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

६. टीआर्पी

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

७. पुनर्वापर (रिसायक्लिंग)

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

८. बुल्स आणि बेअर्स

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

------------------------------------

**पुणे विद्यापीठ**

**संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग**

## प्रवेश परीक्षा २००६– सामाइक लेखी परीक्षा

रविवार, २ जुलै २००६ वेळः तीन तास एकूण गुणः १००

सूचनाः * This is Marathi version of the question paper. It will have to be answered in Marathi only. If you wish to answer in English, ask for the English version. ही प्रश्नपत्रिका मराठीत आहे. ती मराठीतच सोडवावी लागेल. आपण इंग्रजीतून उत्तरे लिहिणार असाल तर इंग्रजी प्रश्नपत्रिका मागून घ्या.

* प्रत्येक प्रश्नामध्ये नमूद केलेली शब्दमर्यादा पाळण्याकडे विशेष लक्ष द्यावे.

* अचूक व्याकरण आणि शुद्धलेखन याकडेही लक्ष द्यावे.

**विभाग २ (गुण ५०)**

प्रश्न १. खालीलपैकी **कोणत्याही एका** विषयावर सुमारे ५०० शब्दांत निबंध लिहा. (२०)

क) सामाजिक अभियांत्रिकी– नवीन राजकीय मंत्र

ख) जागतिक तापमानवाढ– कारणे व उपाय

ग) भारताला मॉल संस्कृती आवश्यक आहे का?

घ) विश्वकरंडक स्पर्धेनंतर भारतीय क्रिकेट

च) भारतीय भाषांतील चित्रवाणी वाहिन्या– हिंदी कार्यक्रमांची नक्कल

प्रश्न २. खालीलपैकी **कोणत्याही चार** विषयांवर सुमारे शंभर शब्दांत टिपा लिहा. (२०)

क) इंडियन क्रिकेट लीग

ख) खैरलांजी आणि त्यानंतर

ग) आध्यात्मिक चित्रवाणी वाहिन्या

घ) महाराष्ट्रातील वीजटंचाई

च) राष्ट्रपती–निवडप्रक्रियेत बदल आवश्यक?

छ) डेरा सच्चा सौदा वाद

ज) मराठी वृत्तपत्रांची वाढती वाचकसंख्या

झ) पुणे महानगरपालिकेत भाजप–सेना–राष्ट्रवादी आघाडी

ट) ऑर्कुटचे वेड

प्रश्न ३ः सुभा जे राव यांचा दि हिंदू या दैनिकात १० जून २००७ रोजी प्रसिद्ध झालेला खालील लेख वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहाः (१०)

सुलुरपासून सेलकरिचल गावापर्यंतचा रस्ता कच्चा, धुळीने भरलेला आणि अतिशय ओसाड आहे. एखादं वाहन गेले की त्याच्यापाठोपाठ धुळीचा हा एवढा लोळ उठतो. कडकडीत ऊन भाजून काढत असते. आणि अचानक नजरेला पडते एक ओॲसिस – हिरव्यागार, दाट झाडीमध्ये लपलेले एक छोटेसे गाव. कोईमतूरपासून ३५ कि.मी. वर असलेल्या या सेलकरिचल गावाचा कायापालट केला आहे एका माणसाने– निवृत्त मुख्याध्यापक ए. एस्. वेलुस्वामी यांनी.

चौदा वर्षांपूर्वी या गावात इतर गावांप्रमाणेच मोजून दोन झाडे होती. पाण्याचा प्रश्न होता, प्रखर उन्हापासून बचाव होण्यासाठी कुठेही आडोसा नव्हता. पण तेव्हा वेलुस्वामी नावाची एक चांगली घटना घडली. आपल्या सामाजिक उत्तरदायित्वाची उत्तम जाण असलेल्या वेलुस्वामींनी कळंगल येथील शाळेत शिकवत असताना विद्यार्थ्यांना निसर्गप्रेमाचे धडे दिले होते.

१९९३ साली त्यांच्या निवृत्तीनंतर वेलुस्वामींनी जणू रोपे लावण्याचा पूर्णवेळ व्यवसायच स्वीकारला. त्यांनी लावलेल्या पहिल्या रोपट्याचा आता मोठा वृक्ष झाला आहे. गावकऱ्यांचा या झाडावर अतोनात जीव आहे. 'त्याचे कारण असे की या झाडाने २० जणांचे प्राण वाचवले,' वेलुस्वामी मोठ्या प्रेमाने झाडाच्या खोडावरून हात फिरवत सांगतात, 'या झाडाजवळ उभ्या असलेल्या एका ट्रकचे ब्रेक खराब झाले आणि तो ट्रक वेगाने बसस्टँडच्या दिशेने यायला लागला. स्टँडवर तेव्हा वीसेक माणसे होती. पण वाटेत या झाडाच्या फांदीला तो ट्रक आपटला आणि जोराचा आवाज झाला, त्यामुळे लोकांनी त्या दिशेने पाहिले आणि ते ट्रकच्या मार्गातून बाजूला होऊ शकले. नंतर ती फांदी तुटली. ' हे सांगताना वेलुस्वामींचे डोळे भरून येतात आणि ते हळूच जिथून ती फांदी तुटली ती जागा कुरवाळतात.

ते रोज पहाटे उठतात, शेतातली कामे आटोपली की १९५७ साली पहिल्या पगारातून घेतलेल्या त्यांच्या अरिहंत सायकलवरून ते दोन किलोमीटरचा फेरफटका मारून त्यांनी लावलेल्या सातशे झाडांशी गप्पा मारतात. छोट्या रोपट्यांना ते वाढण्याची प्रेरणा देतात, फळांनी लगडलेल्या झाडांचे कौतुक करतात. सुकू लागलेले झाड पाहिले की वेलुस्वामी दुःखी होतात. 'आपल्या घरातला तरणाताठा पोरगा अचानक मरणाच्या वाटेला लागला तर तुम्हाला नाही का वाईट वाटणार? ' असा त्यांचा प्रश्न असतो.

आतापर्यंत त्यांनी स्वतःच्या निवृत्तीवेतून खर्च करून एक हजाराहून जास्त झाडे लावली आहेत. या कामात त्यांना थोडीफार मदत करतो ७२ वर्षांचा पालनी गोंदर. हा पूर्वी हमाल होता– आता तो रोपांसाठी आळी तयार करतो, त्यांना पाणी घालतो, त्याच्या परीने वेलुस्वामींचे काम हलके करण्याचा प्रयत्न करतो. गावात पाण्याची टंचाई असूनही झाडांसाठी पाणी मिळवतो. 'मी सकाळी गावातल्या पाण्याच्या नळावर जातो. मी झाडांसाठी पाणी नेतो म्हणून तिथल्या बायका माझ्याशी भांडतात. पण झाडाच्या सावलीत बसायला मात्र त्यांना आवडतं.'

या वृक्षवेड्या माणसाला एक गोष्ट बदलायची आहे. ती म्हणजे तरुण पिढीत असलेली निसर्गाबद्दलची उदासीनता. 'त्यांना साधी झाडांची आपल्या भाषेतली नावे माहीत नसतात. त्यांना निसर्गाबद्दल प्रेम निर्माण व्हावे म्हणून काहीतरी केले पाहिजे', वेलुस्वामी खेदाने म्हणतात. झाडांना सुद्धा माणसांचा सहवास आवडतो. तुम्ही कौतुकाने एखाद्या झाडाकडे पाहिले तर ते तुम्हाला हुंकार देते, त्याला स्पर्श केलात तर ते हरखून जाते,' असा त्यांना विश्वास आहे.

---

**(पुढील प्रश्नांची जास्तीतजास्त ४० शब्दांत उत्तरे द्या.)**

प्र. १ या लेखाला दोन समर्पक शीर्षके द्या.
प्र. २ 'तेव्हा वेलुस्वामी नावाची एक चांगली घटना घडली' या वाक्यप्रयोगातून तुम्हाला काय बोध होतो?
प्र. ३ वेलुस्वामींची निष्ठा कशाकशांतून प्रतीत होते?
प्र. ४ वेलुस्वामींना कोणत्या एका बाबतीत बदल घडवून आणायचा आहे? का?
प्र. ५ अशा प्रकारचे लेख वृत्तपत्रांत वरचेवर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे, असे तुम्हाला वाटते का?

---